# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- (सन २०२३-२०२४)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि. इतके आहे.पाणी पुरवठा विभागाचे दैनंदिन कामकाज प्रभाग समिती निहाय चालते प्रभाग समिती क्र. १ ते ५ मनपा कार्यक्षेत्रामध्ये एकूण २०२७ बोअरवेल आहेत. अस्तीत्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

प्रभाग समिती निहाय मनपा कार्यक्षेत्रात नागरीकांच्या बोअरवेल नादुरुस्तीच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच सन्मा. पदाधिकारी व नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते. सद्या कोंडवाडा येथील मनपाच्या भंडारगृहात (उदा. हातपंप साठी लागणारे साहित्य जीआय युनिअन, जीआय पाईप, हॅन्ड पंप सिलेंडर, हॅन्ड पंप जीआय स्टॅन्ड, वॉटर टॅक, जीआय हेड, गन मेटल अप्पर व्हॉल्व, गन मेटल लोवर व्हॉल्व, स्टेनलेस स्टील प्लंगर रॉड, रेड्युसर कॅप, गन मेटल प्लंगर लॉक बॉडी, व्हॉल्व रबर सिटींग, सिटींग रिंग, पंप बकेट, गन मेटल फ्लॉवर, गन मेटल चेक व्हॉल्व गाईड, गन मेटल चेक व्हॉल्व सेट, सिलेंडर बॉडी लाईनर, गॅलोनीस हॅन्डल बार, स्टेनलेस स्टील हॅन्डल बार, एसकेएफ बेअरिंग ६२०४ झेड, रोलर चैन, बॉडी नटबोल्ट, जीआय वॉशर एम-१२.४ एम.एम., रॉड कपलिंग, कनेक्टींग रॉड, कनेक्टींग रॉड १२ एम.एम., हेड फॉर इंडिया मार्क, बोअरिंग ग्रिस व सबमर्सिबल पंप साठी लागणारे साहित्य ३ कोर ४.० स्के.एम.एम. कॉपर केबल, पॅनेल बोर्ड १ ते ६ एचपी, पीव्हीसी आरमाऊर्ड केबल २ कोर ४ स्के. एम.एम. ॲल्युमेनिअम कंडेनकटर, सबमर्सिबल पंप सेट २३०व्हो ५० एचझेड एसी सप्लाय, मोटर २ एचपी थ्री फेज १४०० एरपीएम ऑल टाईप्स, एमडीपीई पाईप आयएसओ ४४२७:१९९६, जीआय कप्लींग निप्पल फ्री क्लास इत्यादी किरकोळ साहित्य खरेदी करावे लागते. याबाबतचे दर दरसुची मध्ये उपलब्ध नसल्यामुळे दरपत्रक मागवून चालु बाजार भावाप्रमाणे सर्वकरांसहित दर मागविण्यात आलेले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबतच्या कामांस दि. २९/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| | **सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबत.** | **रु. ५६,२०,६१८/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

सदर कामा करीता प्राप्त ई निदेतील निविदाकारांनी ऑनलाईन सादर केलेले कागदपत्रांची पडताळणी करून उक्त निविदाकारांपैकी  १) अक्षय कंन्सट्रक्शन व २) तुषार मोहन चौधरी यांचा संबंधीत कामाचा अनुभवाचा दाखला नसल्यामुळे १) अक्षय कंन्सट्रक्शन व २) तुषार मोहन चौधरी यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. उर्वरित दोन निविदाकारांचे प्राईजबिड उघडण्यात आले असता श्री राम दशरथ कोरे या निविदाकारंची निविदा सर्वात कमी प्राप्त झालेली आहे.

श्री राम दशरथ कोरे यांना सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्र.** 298 **दिनांक :-** 26 / 06 /**२०२३**

सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव, कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाच्या सन २०२३-२०२४ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबत. निविदेतील दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**